राज्य शासकीय कर्मचा-यांना
अंतरिम वाढ देणे.

८५

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांक पीसीआर-१०८५/सीआर-१०१/एसईआर-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ मे १९८५.

CR1985051601

## परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीसीआर-१०८३/सीआर-१०८४/एसईआर-७, दिनांक ११ सप्टेंबर १९८४ अन्वये दिनांक १ जून १९८३ पासून शासकीय कर्मचारी आणि इतरांना अंतरिम वाढ मंजूर करण्यात आलेली आहे. सदर अंतरिम वाढ निलंबनाखाली असलेल्या कर्म-चा-यांना देय आहे किंवा नाही याबाबतीत शासनाकडे विचारणा करण्यात आली होती. शासन असा खुलासा करीत आहे की, निलंबनाखाली असलेल्या कर्मचा-यांना, जरी त्यातले काही कर्मचारी दिनांक १ जून १९८३ च्या अगोदर पासून निलंबीत झाले असले तरी, अंतरिम वाढ देय होईल. सदर अंतरिम वाढीची रक्कम त्यांना मिळणा-या निर्वाह भत्त्याची रक्कम ज्या वेतन टप्प्यामध्ये येत असेल त्या वेतन टप्प्याशी सुसुचित अशी असेल. निलंबनाखाली असलेल्या कर्मचा-यांना देय होणारी दिनांक १ जून १९८३ ते ३१ मार्च १९८४ या कालावधी-तील अंतरिम वाढीची थकबाकी त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्यात



पीएस/२०९८५.

यावी व दिनांक १ एप्रिल १९८४ पासूनची अंतरिम वाढ रोखीत देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्यं. दे. पानसे,
शासनाचे सह सचिव.

प्रति

महालेखापाल १ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल २ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल १ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल २ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
×प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
×प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
×सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
×प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
×सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर-७.

×पत्राद्वारे.

१९८५ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.

पीएस/२०९८५.